# बोदवड महाविद्यालयात उपहार गृहाचे उदघाटन

कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात सुमारे दोन लक्ष खर्चाच्या नवीन उपहारगृह वास्तूचे उदघाटन व विद्यार्थी अर्पण सोहळा पार पडला.

बोदवड सार्वजनिक को-ऑप. एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष मिठूलालजी अग्रवाल यांनी स्वतंत्रदिनी उदघाटन केले. प्रसंगी उपाध्यक्ष अजयजी जैन, सचिव विकासजी कोटेचा, संचालक श्रीरामभाऊ बडगुजर, विजयजी जैन, सुभाषजी शर्मा, आनंदजी जैस्वाल, राविंद्रमाटे, उपस्थित होते. स्वागत उपप्राचार्य डी. एस. पाटील यांनी केले. विद्यार्थीहिताच्या उपक्रमास नेहमी पाठींबा असेल, अशी ग्वाही मिठूलालजी अग्रवाल यांनी दिली. वास्तूच्या डिझायनर कु. अनामिका चौधरी यांच्या कल्पनेतून उत्तम उपहारगृह साकारल्याबद्दल त्यांचा सत्कार अध्यक्षांनी केला.

विद्यार्थीभिमुख नवीन कोर्स सुरु करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सचिव विकासजी कोटेचा यांनी सांगितले. उपहारगृहामध्ये बसण्याचे महत्व आणि फायदे प्राचार्य डॉ. अरविंद चौधरी यांनी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उपहारगृह समिती समन्वयक डॉ. चेतन शर्मा यांनी केले. समिती सदस्य प्रा. रत्ना जवरास, डॉ. विनोद चौधरी, डॉ. गीता पाटील, डॉ. अपर्णा चंद्रस, प्रतीक्षा धनगर, सुभाष भोई, प्रा. संदीप बर्डे, डॉ, कामिनी तिवारी, डॉ. शरद काठोके, डॉ. अनिल बारी, डॉ. रुपाली तायडे, डॉ. किशोर पाठक, डॉ. मनोज निकाळजे, डॉ. पी.एन. पाटील, डॉ. वंदना नंदवे, प्रा. अजय पाटील, कार्यालय अधिक्षक श्री विजय बडगुजर, श्री. बाबुराव हिवराळे, समीर पाटील, राजेंद्र मोपारी, जितेंद्र बडगुजर, दीपक जोशी, अतुल पाटील, यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.








